| MHWR030001392025 | दाखल तारीख | ०६/०१/२०२५ |
|---|---|---|
| | नोंद तारीख | ०७/०१/२०२५ |
| | निकाल तारीख | २६/११/२०२५ |
| | कालावधी | **वर्षे महिने दिवस** |
| | | **० १० २०** |

**वर्धा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,(न्या.क्र.३) यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी हेमंत प्र. पंचोली)

**म.सं.कौ.हिं.का. अर्ज. ०८/२०२५** **निशाणी क्र. ५**

| | | |
|---|---|---|
| १. | **प्रतिक्षा सागर ढोमणे**<br>व. व. २३, व्यवसाय – घरकाम<br>ह.मु. पोष्ट– (आई) संध्या शंकरराव इंगळे,<br>यांचे घरी, गंगाधररावजी बालपांडे यांचे घरी<br>भाडयाने, मौजा नविन मसाळा, झोरे लेआऊट,<br>घर क्र. ३५०, वर्धा, ता.जि.वर्धा | ... **अर्जदार** |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | **सागर रमेशराव ढोमणे,**<br>व.व. ३१, व्यवसाय – नोकरी, | |
| २. | **गिताबाई रमेशराव ढोमणे**<br>व.व. ५४, व्यवसाय – घरकाम, | |

| | | |
|---|---|---|
| | दोघेही रा. मु.पो. सोनेगाव (वाठोडा), पोष्ट बुटीबोरी, ता. जि. नागपूर | ... **गैरअर्जदार** |

**अर्ज– कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अंतर्गत**

-----------------------------------------

अर्जदारतर्फे वकील – श्री. एस.एन. चिचघरे

गैरअर्जदारातर्फे प्रकरण एकतर्फा

-----------------------------------------

## न्यायनिर्णय

(दिनांक २६/११/२०२५ रोजी घोषीत)

प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अंतर्गत दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे कथनानुसार अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह दि. २३/०५/२०२३ रोजी हिंदू धर्म शास्त्राप्रमाणे गजानन सभागृह, बरबडी रोड, वर्धा, ता. जि. वर्धा येथे संपन्न झाला. त्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ यांचेकडे सोनेगाव वाठोडा येथे नांदणेस गेल्या. गैरअर्जदार क्र. १ व २ लग्नानंतर २ महिने चांगले वागले आणि त्यानंतर त्यांच्या वागण्यात फरक जाणवु लागला.

३. अर्जदाराचे पुढील कथन की, अर्जदार हिस तिचे बी.टेक चे शैक्षणीक सत्र पूर्ण करायचे होते. परंतु गैरअर्जदार क्र. १ व २ यांना ते अमान्य होते. म्हणून त्या

कारणावरुन अर्जदार हिस सदैव शाब्दीक शिवीगाळ करीत होते व तिला शारीरीक मारहाण करीत होते. गैरअर्जदार क्र. २ ही गिताबाई रमेशराव ढोमणे गैरअर्जदार क्र. १ याच चुकीचे सांगून त्याचे मनात अर्जदार हिचे विरोधात द्वेष निर्माण करीत होते व अर्जदाराचा मानसिक छळ करीत होते.

४. अर्जदाराचे पुढील कथन की, गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिस वर्धेवरुन पेपर सोडवून गेल्या नंतर तिला पोळयाच्या पहिल्या दिवशी मारहाण केली. त्यामुळे अर्जदार हिच्या कमरेला, पोटाला आणि गालावर माराचे वळ उमटले होते ते अंदाजे ऑगस्ट २०२३ या वर्षामध्ये घडले होते. त्या घटनेनंतर अर्जदार हि तिचा सख्खा भाऊ मोहित शंकरराव इंगळे यांच्यासोबत वर्धेला आली आणि अर्जदाराला लागलेल्या माराचा उपचार अर्जदाराने डॉ. सौ. गोल्हर, पंजाब कॉलनी, वर्धा यांच्याकडे उपचार करुन घेतला.

५. अर्जदाराचे पुढील कथन की, या घटनेच्या एक महिन्यानंतर गैरअर्जदार क्र. १ वर्धेला येवून अर्जदार हिस प्रेमाणे समजावून घेवून सोनेगांव वाठोडा येथे घेवून गेला आणि अर्जदार हि सुद्धा मागचे झालेले सर्व अयोग्य प्रकरण भांडणे, मारहाण, शिवीगाळ, मनात न धरता गैरअर्जदार क्र. १ सोबत नांदावयास गेली. परंतु त्यानंतर ऑक्टोंबर–२०२३ मध्ये कोराडी मातेच्या दर्शनाला गेले असता, शेजारी राहणारी मनिषा कळसकर हिच्या कारणावरुन अर्जदार हिस देवळातच मारहाण केली व घरी येवून सुद्धा

अर्जदाराला मारहाण केली. या घटनेमुळे अर्जदार हिच्या पाठीमध्ये, कमरेमध्ये, पोटावर आणि डोक्याचे केस ओढून अतोनात मारहाण केली. त्या घटनेमुळे अर्जदाराच्या पोटामध्ये खूप दुखत होते व तसेच अतिवेदनेमुळे त्रस्त झाली होती. तसेच वेदनेची तिव्रता असहनिय होवून आणि रक्तस्त्राव होवून गर्भपात झाला होता. त्यानंतर अर्जदाराने आपल्या भावाला बोलावून घेतले होते. अर्जदार हिला मारहाण केल्याच्या दुसऱ्या दिवशी हा गर्भपातानंतर अर्जदाराने वर्धेला डॉ. सौ. गोल्हर मॅडम, पंजाब कॉलनी वर्धा येथे उपचार घेतला.

**६.** अर्जदाराचे पुढील कथन की, अर्जदाराला गैरअर्जदार क्र. १ हा फोन करुन अश्लील शिवीगाळ करीत होता. त्यामुळे अर्जदाराची मानसिक स्थिती खालावत होती. त्यानंतर अर्जदार हिने दि. १९/१०/२०२३ रोजी महिला तक्रार निवारण कक्ष वर्धा येथे तक्रार दिली होती. त्या तक्रारीरीमध्ये गैरअर्जदार क्र. १ हा त्यांचे जावाई विवेक त्रंबकराव पवार यांना घेवून वर्धा महिला तक्रार निवारण मंच येथे आला होता. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ याने महिला तक्रार निवारण कक्ष, वर्धा येथे 'मी योग्य प्रकारे नांदविन' अशी हमी देवून अर्जदाराचे मन वळविले होते. त्यामुळे अर्जदार हि गैरअर्जदार क्र. १ सोबत दुसऱ्यांदा नांदावयास गेली. त्यानंतर अर्जदार पाच ते सहा महिने योग्य नांदली व गैरअर्जदार क्र. १ हा देखील अर्जदारासोबत चांगला वागू लागला.

**७.** अर्जदाराचे पुढील कथन की, त्यानंतर अर्जदार हिस बी.टेक. या डिग्रीच्या

सातव्या सेमिस्टरची परिक्षा द्यायची होती, म्हणून अर्जदाराला वर्धेला यायचे होते. परंतु गैरअर्जदार क्र. १ याने पुन्हा परिक्षा देण्यास मज्जाव केला आणि अर्जदाराला चारचाकी गाडीच्या खरेदी साठी आईकडून रु. ५,००,०००/– रुपये पैसे घेवून ये याबाबत तगादा लावला आणि गैरअर्जदार क्र. २ यांनी गैरअर्जदार क्र. १ याला अर्जदाराविरुद्ध भडकावले. त्यानंतर अर्जदार हिस गैरअर्जदार क्र. २ हिने झाडणीने मारुन घराबाहेर काढले आणि गैरअर्जदार क्र. १ हा प्रत्यक्षदर्शी साक्षदार होता. या घटनेनंतर अर्जदार पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे तक्रार दि. २९/०३/२०२४ रोजी दिली होती. त्या तक्रारीनंतर अर्जदाराचे आई व भावाने तिला वर्धेला सोबत घेवून आले. तेव्हापासून अर्जदार ही आई व भावासोबत राहत आहे.

८. अर्जदाराचे पुढील कथन की, त्या घटनेनंतर अर्जदारास गैरअर्जदार क्र. १ अर्जदार हिस कधीही नांदायला सोबत राहायला घेण्यास आला नाही. त्यानंतर दि. ४/११/२०२४ रोजी अर्जदाराला नोटीस दिला व त्या नोटीसमध्ये त्याने अर्जदारावर निरर्थक आरोप लावले होते.

९. अर्जदाराचे पुढील कथन की, अर्जदार हि दि. २९/०३/२०२४ पासून आईच्या घरी आणि तिचे अल्पशा उत्पनावर उदरनिर्वाह करीत आहे. तसेच तिची आई हिचे दयेवर आणि मर्जीनुसार अर्जदार सध्या जगत असुन शैक्षणिक सत्र पूर्ण करु पाहत आहे. त्यामध्ये गैरअर्जदार क्र. १ ची कोणतीही फारशी मदत होत नाही.

**१०.** अर्जदार हिने कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा मेकॅनिकल इंजिनीअर असून सीएट टॉयर या कंपनीत चांगल्या पदावर कार्यरत असून त्याला दरमहा ६०,०००/– रुपये पगार आहे व त्यावर इतर कोणाचीही पालन पोषणाची जबाबदारी नाही व तसेच तिला स्वतःला कोणतेही उत्पन्नाचे स्त्रोत नाही व ती शिक्षण घेत आहे. त्यामुळे गैरअर्जदारांनी केलेल्या छळावरुन तिला अंतरीम पोटगी देण्यात येते.

**११.** त्याविरुद्ध गैरअर्जदार यांनी आपली हजेरी न्यायालयात दि. ३०/०८/२०२५ रोजी निशाणी ९ वर उत्तर दाखल करण्याकरीता वेळ मागितला. गैरअर्जदार यांना वेळोवेळी पुढील तारीख दिली असतांना सुद्धा त्यांनी आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे निशाणी क्र. १ वर दि. १८/११/२०२५ रोजी गैरअर्जदारा विरुद्ध उत्तर दाखल नाही व प्रकरण पुढे चालविण्यात आले.

**१२.** अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे वरील कथनांचा विचार करता खालील मुद्दे माझे विचाराधीन झाले आहेत व त्यावर कारणमिमांसेसह मी माझे निष्कर्ष नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा प्रथमदर्शनी कौटुंबिक छळ केला आहे, असे अर्जदार सिध्द करते काय? | होकारार्थी. |
| **२.** | अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ३. | अर्जदार ही पोटगी रक्कम व घरभाडे मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | होकारार्थी<br>**(अर्जदार हिस गैरअर्जदार क्र. १ कडुन अर्ज दाखल तारखेपासुन दरमहा पोटगी रक्कम रुपये १२,०००/– प्रमाणे )** |
| ४. | आदेश काय? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

**१३.** अर्जदार यांच्या युक्तीवाद ऐकण्यात आला. याकरीता अर्जदार हिने आपल्या कथनांच्या पृष्ठार्थ खालील कागदपत्रांवर आपले भिस्त मांडली आहे.

| **अ.क्र.** | **कागदपत्रे** |
|---|---|
| १. | लग्न पत्रीका दि. २२/०५/२०२३. |
| २. | डॉ. गोल्हर हॉस्पीटल यांचे दि. १८/१०/२०२३ रोजीचा वैद्यकीय कागदपत्र. |
| ३. | पोलीस स्टेशन बुट्टीबोरी दि. २९/०३/२०२४ रोजीची तक्रार. |
| ४. | एम.सी. रिपोर्ट दि. १९/१०/२०२३. |
| ५. | अर्जदार हिने महिला तक्रार निवारण कक्ष, वर्धा येथे दि. ०७/११/२०२४ रोजी दाखल केलेली तक्रार. |
| ६. | अर्जदार हिचे आधार कार्ड. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १–**

**१४.** या न्यायालयाला हे बघणे गरजेचे आहे की, अर्जदार हिच्या गैरअर्जदाराने प्रथम दर्शणी कौटुंबिक हिंस्साचार/छळ केला आहे किंवा कसे. अर्जदार हिने प्रत्यक्ष अर्ज हा अंतरिम पोटगी, सुरक्षा आदेश व इतर मागणी करीता केलेला आहे. अर्जदाराने सदरचा

अर्ज हा शपथेवर केलेला आहे. त्या विरुद्ध गैरअर्जदार यांना पूरेपूर संधी देवून सुद्धा त्यांनी आपले म्हणणे किंवा बाजू मांडलेली नाही. अर्जदार ही निर्वीवादीतपणे गैरअर्जदार क्र. १ यांनी पत्नी असून त्यांच्या विवाह दि. २३/०५/२०२३ मध्ये गजानन महाराज सभागृह, बरबडी रोड, वर्धा येथे संपन्न झाला आहे. त्यानंतर अर्जदार हिने केलेल्या कथनाप्रमाणे तिला वेळोवेळी अपमानास्पद वागणूक देण्यात आली. तिला तिच्या लग्नात आलेले सोने चांदीचे दागिणे स्त्रीला हे गैरअर्जदारांनी आपल्या ताब्यात घेतले. तसेच ती सोनेगाव वाठोडा येथे नांदण्यास गेली असता, तिला जिवनावश्यक वस्तू दिल्या नाही व तसेच तिचे बीटेकचे शेवटचे सेमीस्टर परीक्षा देण्यास सुद्धा अडथळा निर्माण केला. तिला शिवीगाळ देणे, टोमणे मारणे व तसेच तिच्या मोबाईलचा वापर करण्यास अटकाव करणे व तो तोडून टाकणे, अशा प्रकारची कृत्ये केली. गैरअर्जदार याने सन २०२३ साली कोराडी येथील देवीच्या दर्शणाकरीता गेले असता शेजारी राहणारी महिला मनिषा कळसकर हिच्या कारणावरुन अर्जदार हिला देवळातच मारहाण केली. तसेच तिला घरी आल्यावर सुद्धा पाठीवर, कमरेवर, पोटावर व डोक्यावर केस ओढून निर्दयीपणे मारहाण केली. त्यामुळे तिला पोटामध्ये अति रक्तस्त्राव सुरु झाला व तिला वर्धा येथे डॉ. गोल्हार यांच्याकडे नेण्यात आले व तिला झालेल्या ईजामुळे गर्भपात सुद्धा करावा लागला. त्याचप्रमाणे अर्जदार हिच्याकडून वेळोवेळी आपल्या आईकडून पैसे आणण्यासाठी सुद्धा दबाव टाकण्यात आला. सदर प्रकारचे कृत्या बाबत अर्जदार

हिने बुट्टीबोरी पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली. त्यानंतर महिला उपदेश केंद्र येथे सुद्धा तक्रार दिली. परंतु तिला गैरअर्जदार यांच्या सोबत स्वभावात कोणताही फरक जाणवला नाही व ते कृत्य चालूच राहिले. अर्जदार ही सदरचा त्रास हा सहन करीत होती, जेणेकरुन गैरअर्जदाराच्या स्वभावात चांगल्या प्रकारच्या बदल होईल. परंतु तसे काही घडले नाही व त्याच्या त्रास अर्जदार हिला चालूच राहिला त्यामुळे तिने दि. २९/०३/२०२४ पासून आपले आईच्या छत्रछायेत राहत असून ती आपले शिक्षण पूर्ण करीत आहे.

**१५.** सदर अर्जदाराने केलेल्या कथनांना प्रथमदर्शनी गैरअर्जदाराने खोडवून काढलेले नाही. त्यामुळे सदर अर्जदार हिचे कथन हे न्यायालयाला प्रथमदर्शनी स्वीकारार्य दिसून येते व तसेच अर्जदाराने यांनी केलेल्या कथनांना अभिलेखावर उपलब्ध असलेल्या दस्तांचा दुजोरा सुद्धा मिळून येतो. जसे की, वैद्यकीय कागदपत्रे अदाखल पात्र तक्रार व महिला उपदेश केंद्र यांच्याकडे तक्रार इत्यादी. त्यामुळे हे न्यायालय मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविते. अर्जदार हिने प्रथमदर्शनी या न्यायालयातून असे दर्शविले की, आपल्या कथनांवर शपथेवरील कथन व दस्तांवर गैरअर्जदाराकडून मानसिक छळ व कौटूंबिक हिंस्साचार सुद्धा होत आहे. सबब मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविते.

<u>मुद्दा क्र. २–</u>

**१६.** प्रत्यक्ष मुद्दा हा अर्जदार हिला गैरअर्जदाराकडून होणाऱ्या कौटूंबिक हिंस्साचारा पासून संरक्षण मिळण्याकरीता आहे. या न्यायालयाने मुद्दा क्र. १ मध्ये निर्णीत केल्याप्रमाणे अर्जदार हिच्यावर गैरअर्जदाराकडून कौटूंबिक हिंस्साचार होत आहे. त्यामुळे अर्जदार ही सदर कौटूंबिक हिंस्साचाराच्या त्रासापासून संरक्षण मिळण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते.

<u>मुद्दा क्र. ३ –</u>

**१७.** प्रत्यक्ष मुद्दा हा अर्जदार हिला अंतरिम पोटगी किती मिळण्यास पात्र आहे किंवा कसे, या बद्दलचा आहे. अर्जदार हिने केलेल्या शपथेवरील कथनांवरुन प्रथमदर्शनी ही बाब दिसून येते की, अर्जदार हि गैरअर्जदारांच्या कौटूंबिक हिंस्साचाराची पिडित आहे. त्याचप्रमाणे, अर्जदार हिला कोणतेही स्वतंत्र उत्पन्न व उत्पन्नाचे स्त्रोत आहे असे दिसून येत नाही. अर्जदार हिला आपल्या आईच्या घरी जावून आश्रय घेण्याकरीता गैरअर्जदाराचे कृत्य जबाबदार आहे. त्यामुळे या न्यायालयाच्या मते अर्जदार ही पोटगी मिळण्यास पात्र आहे. अर्जात शपथेवर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार हिला कोणताही उत्पन्नाचे स्त्रोत नाही. त्याउलट, गैरअर्जदार याचे मेकॅनिकल इंजिनिअर या तांत्रीक शाखेत शिक्षण झाले असून तो सीएट टायर कंपनीत बुट्टीबोरी मध्ये चांगल्या पदावर कार्यरत असून त्याला दरमाहे ६०,०००/– रुपये वेतन/पगार मिळत आहे. त्यावर

निर्विवादीतपणे अर्जदार हिच्या आर्थिक व कायदेशीर खर्चांच्या जबाबदारी ही गैरअर्जदारावर आहे. असे असतांना सुद्धा गैरअर्जदार हा अर्जदार हिच्यावर कौटूंबिक हिंस्साचार करत आहे व तिला दैनंदिन लागणारा खर्च सुद्धा देत नाही. अर्जदार ही तिच्या आईच्या घरी राहत असून आपले पुढील शिक्षण करीत आहे व तिला उत्पन्नाचा स्त्रोत नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ याच्या कडून पोटगी मिळण्यास पात्र आहे. गैरअर्जदार याचे अभिलेखावर दाखल केलेल्या जुलै–२०२२ च्या पगार पत्रका प्रमाणे असे दिसून येते की, सन जुलै– २०२२ या साली तो सीएट टायर कंपनी येथे कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असून त्याला त्याच्या पगारात ५१,९८१/– रुपये असा व त्यात सक्तीची कपात २५७०/– रुपये आहे.

१८. येथे महत्वाची बाब म्हणजे गैरअर्जदार क्र. १ हा उच्च शैक्षणिक असून येथे एका नामांकीत टायर कंपनीमध्ये चांगल्या पदावर कार्यरत असून त्याला सन २०२२ साली महिना जुलै ५१,०००/– रुपयाचा पगार होता. येथे ही बाब नमूद करणे गरजेचे आहे की, अर्जदार हिने गैरअर्जदाराची अद्यावत पगार पावती अभिलेखावर जोडलेली नाही. त्यासाठी कित्येक वाजवी कारणे असू शकतात. त्यामुळे हे न्यायालय गैरअर्जदार क्र. १ याच्या पगार हा ६०,०००/– रुपये सन २०२५ साली असावा असे अंदाज धरुन अर्जदार हिला लागणारा शैक्षणिक, राहण्याच्या व पोटगीचा खर्च येथे निर्णित करते. त्याचप्रमाणे गैरअर्जदार यांना त्याच्यावर अर्जदार व्यतिरीक्त इतर

कोणाचीही जबाबदारी आहे किंवा कसे या बाबत कोणतेही म्हणणे दाखल केले नाही व त्याचप्रमाणे मालमत्ता आणि दायित्वाचे प्रतिज्ञापत्र सुद्धा अभिलेखावर दाखल केले नाही. अशा प्रसंगी या न्यायालयाच्या मते अर्जदार ही गैरअर्जदाराकडून घर खर्च, पोटगी व शैक्षणिक खर्च याकरीता दरमहा १२,०००/– रुपये प्रत्यक्ष अर्ज दाखल केल्या पासून ते अर्ज निकाली होईपर्यंत मिळण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय अर्जदाराला अंतरिम पोटगी म्हणून अर्ज दाखल केला तारखेपासून १२,०००/– रुपये दरमहा निर्धारीत करीत आहे व मुद्दा क्र. ३ चे उत्तर 'होकारार्थी' नोंदवित आहे.

वरील सर्व कारणमिमांसा व निष्कर्षांचा विचार करता मुद्दा क्र. ४ साठी खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| २. | गैरअर्जदार क्र. १ व २ यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदार हिचा कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार करु नये तसेच संरक्षणअधिकारी/पोलीस अधिकारी यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराला आवश्यकता असल्यास संरक्षण द्यावे. |
| ३. | गैरअर्जदार क्र. १ यास आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार हिस दरमहा रक्कम रुपये १२,०००/– (रुपये बारा हजार) प्रमाणे पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन म्हणजेच दि.०४/०१/२०२५ पासुन अर्जदारास अदा करावी. |

| | |
|---|---|
| ४. | अर्जदार, गैरअर्जदार व संरक्षण अधिकारी यांना या न्यायनिर्णयाची प्रत मोफत देण्यात यावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.) |

HEMANT PRAKASH PANCHOLI
Digitally signed by HEMANT PRAKASH PANCHOLI
Date: 2025.12.03 10:51:54 +0530

**वर्धा** **(हेमंत प्र. पंचोली)**

**दिनांक २६/११/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा (न्या. क्र.३)**

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. M. Bijve<br>Stenographer Grade III |
| Court | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Wardha |
| Date | : | 26/11/2025 |
| Signed by P. O. on | : | 03/12/2025 |
| Uploaded on | : | 03/12/2025 |